लोकमत पू. पान क्र. १

# लिलावातील सोने मिळवून देतो म्हणत मॅनेजरला गंडा

## जास्त नफ्याचे आमिष ; ६० लाख लुबाडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एका नॉन बँकिंग फायनान्स कंपनीतील मॅनेजरने तारण सोने लिलावात मिळवून देतो व ते खुल्या बाजारात विकून चांगला नफा कमवून देण्याचे आमिष दाखवत एका कार डिलरची ६० लाख ८१ हजार रुपयांना फसवणूक केल्याची घटना मीरा रोडमध्ये घडली आहे.

सिल्वर पार्कजवळील आशादीप इमारतीत फेडबँक फायनान्शियल सर्व्हिस लिमिटेडची शाखा आहे. त्या ठिकाणी गिरीजाशंकर सतीश तिवारी (रा. चामुंडा क्लासिक) हा व्यवस्थापक म्हणून काम करीत होता. तिवारी याची ओळख संघवी नगरमधील कार डीलर अमित जयस्वाल याच्याशी झाली.

जानेवारी ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत तिवारी याने फायनान्स कंपनीच्या मीरा रोड कार्यालयातील व्यवस्थापक म्हणून काम करीत असताना जयस्वाल याला सांगितले की, फेडबँक फायनान्शियल सर्व्हिस या नॉन बँकिंग फायनान्स कंपनीमध्ये जे ग्राहक गोल्ड लोन घेतात व घेतलेले कर्ज फेडू शकत नाहीत, अशा त्यांनी तारण ठेवलेल्या सोन्याचा लिलाव केला जातो.




- तारण ठेवलेले सोने लिलावात मिळवून देतो. लिलावातील सोने विकत घेऊन ते खुल्या बाजारात विकून फायदा मिळवून देतो, असे सांगितले. सुरुवातीला जयस्वालकडून पैसे घेऊन सोने लिलावात घेऊन त्यांना काही फायदा तिवारी याने करून दिला.
- त्यामुळे जयस्वाल यांचा तिवारीवर विश्वास बसला होता. त्यानंतर तिवारी याने गोल्ड लोनमधील तारण सोने तो काम करीत असलेल्या फायनान्स कंपनीकडून खरेदी करायचे सांगून वेळोवेळी पैसे घेतले. अशा प्रकारे एकूण ६० लाख ८१ हजार रुपये तिवारी याने जयस्वालकडून उकळले.
- नंतर मुद्दलदेखील न देता तिवारी हा कंपनीतील नोकरी,मीरा रोड येथील घर सोडून पळून गेला. मोबाइलदेखील बंद झाला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तिवारीविरुद्ध फिर्याद दिली. गुरुवारी काशिमीरा पोलिसांनी तिवारीवर गुन्हा दाखल केला असून, सहा. पोलिस निरीक्षक योगेश काळे हे तपास करीत आहेत.

# 'आनंदाचा शिधा', धान्य काळ्या बाजारात विक्री

## चालक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** सरकारी शिधावाटप दुकानात शासनाकडून आलेलेन धान्य काळ्या बाजारात विक्री प्रकरणी दुकान चालवणाऱ्या राहुल गौड या कर्मचाऱ्यास अटक करत चालक संस्थेच्या अध्यक्ष, सचिवासह अन्य एकावर नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पूर्वेच्या शिर्डीनगर येथील रीना पार्कमध्ये शिधावाटप दुकान क्रमांक ४१ फ-२०७ हे आहे. हे दुकान कीर्ती बाजार ग्राहक सहकारी संस्थेमार्फत चालवले जाते, तर राहुल गौड हा दुकानातील सर्व काम पाहतो. धान्य हे काळ्या बाजारात विकल्याच्या तक्रारीनंतर अधिकारी शैलेंद्र मायावंशी यांनी दुकानात तपासणी केली.

### कर्मचाऱ्याला अटक

- तपासणीत साठा पुस्तकाप्रमाणे ६ लाख ७२ हजार किमतीचा १७ हजार १५१ किलो तांदूळ; ४ लाख ५६ हजार किमतीचा १६ हजार ७०७ किलो गहू व ४० हजार किमतीचे आनंदाचा शिधाचे १४४ धान्य संच यांचा अपहार झाल्याचे आढळून आले.
- शिधापत्रिकाधारकांना वितरित करायचा साठा संगनमताने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अपहार करून तो अनधिकृतपणे काळ्या बाजारात विक्री केल्याप्रकरणी राहुल गौड याच्यासह कीर्ती बाजार ग्राहक सहकारी संस्थेचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी यांच्यावर जीवनावश्यक वस्तू कायदा तसेच महाराष्ट्र फूड ग्रीन रेशनिंग आदेशानुसार १५ मार्च रोजी सायंकाळी नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# दुकानातून मोबाइलची चोरी

**मीरारोड :** भाईंदर पश्चिमेस रेल्वे स्थानकाजवळ इंदिरा मार्केट आहे. त्या ठिकाणी राहुल बिडलान (३२, रा. गणेश देवल नगर) यांचा मोबाइल दुरुस्तीचा व्यवसाय आहे. १६ मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास अनोळखी चोरट्याने दुकानात प्रवेश करून १४ हजार रुपये किमतीचा दुकानातील मोबाइल चोरून नेला. १६ मार्चच्या रात्री भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून हवालदार के. आर. पवार तपास करीत आहेत.

# लॅपटॉपसह मोबाइल चोरीला

**मीरारोड :** भाईंदर पूर्वेच्या व्यंकटेश नगरमध्ये राहणारे प्रीतम जैन यांचे शीतल शॉपिंग सेंटरजवळ कोचिंग क्लासेस आहेत. क्लासेसच्या केबिनमधील टेबलवर ठेवलेला लॅपटॉप व ड्रॉवरमधील तीन मोबाइल फोन अनोळखी चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी नवघर पोलिसांनी शनिवार, दि. १६ मार्च रोजी गुन्हा दाखल केला आहे. दि. २५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप व ११ हजार रुपये किमतीचे मोबाइल असा ३६ हजारांचा मुद्देमाल चोरीला गेला. सहायक पोलिस निरीक्षक पालवे हे तपास करत आहेत

# मीरा रोडमधून दुचाकी चोरीला

**मीरा रोड :** कांदिवलीच्या हिंदुस्तान नाका येथे राहणारे पीओपी कारागीर रामसेवक जयराम यादव (३९) यांनी त्यांची दुचाकी मीरा रोडच्या हटकेश येथील भाजी मार्केटजवळ सार्वजनिक रस्त्यावर उभी केली. तेथून भाजी घेऊन रात्री ते गाडी पार्क केली होती त्या ठिकाणी आले असता गाडी चोरीला गेली होती. याप्रकरणी शनिवारी रात्री काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक किरण बघडाणे हे तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

## पांन टपरीतून रक्कम चोरीला



**मीरारोड :** बोरिवलीच्या टाटा पॉवर हाऊस जवळ माउली चाळीत राहणारा हर्ष सत्येंद्र गुप्ता यांची काशीमीरा येथील राष्ट्रीय महामार्गावर मीरा गावठाण बसस्टॉपच्या मागे कृष्णा नावाची पान टपरी आहे. १४ मार्च रोजी रात्री अकरा वाजता गुप्ता याने पान टपरी बंद केली. दुसऱ्या दिवशी सकाळी ते आले असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या पान टपरीचा दरवाजा तोडून आतील २५ हजार रुपये रोख व २४ हजार रुपयांचा माल असा ४९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. तशी फिर्याद १६ मार्च रोजी गुप्ता यांनी दिल्यावरून काशीमीरा पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हवालदार सोनकांबळे तपास करत आहेत.

## क्रिकेटवर ऑनलाइन जुगार; एकाला पकडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** भाईंदर पश्चिम छत्रपती शिवाजी महाराज मुख्य स्टेशन मार्गावर गुडवील बार आणि रेस्टॉरंट आहे. शनिवारी सायंकाळी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिस पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे येथून किशोर मनसुखलाल शहा (४२, रा. ऋषभ बिल्डिंग, पटेलनगर) याला ताब्यात घेतले.

शाह हा मोबाइलवर वेबसाइटद्वारे ऑनलाइन क्रिकेटवर जुगार खेळत व खेळवताना सापडला. त्याने नीलेश नावाच्या व्यक्तीकडून ऑनलाइन क्रिकेटवर जुगार बेकायदेशीरपणे खेळण्यासाठी आयडी व पासवर्ड घेतला असल्याचे चौकशीत समोर आले आहे.

भाईंदर पोलिस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा हवालदार असिफ मुल्ला यांच्या फिर्यादीवरून किशोर व निमेशवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधिक तपास करत आहेत.

## छळासह फसवणूक, पतीसह सासरच्यांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या पूनम गार्डन येथील समृद्धी इमारतीत राहणारे पती हेमंतकुमार कृष्णकुमार गुप्ता, सासरे श्रीकृष्ण गुप्ता, सासू मधु गुप्ता व नणंद रितू गुप्ता या चौघांनी २०१० ते २०२० दरम्यान लग्न झाल्यापासून आपला विविध कारणांनी सातत्याने शारीरिक व मानसिक छळ केला. पती हेमंत हा शारीरिकदृष्ट्या कमकुवत असल्याची बाब लपवून ठेवत फसवणूक केली, अशी हेमंतच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून मीरारोड पोलिसांनी शनिवारी हेमंतसह त्याचे आई - वडील व बहीण यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक रामेश्वर पडवळ तपास करत आहेत.

लोकमत पान क्र. 6

## नशा करण्यासाठी जाऊ दिले नाही म्हणून केली आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** भाईंदर पश्चिमेस भोला नगर गल्ली क्रमांक ४ मध्ये राहणाऱ्या रिजवान जमशेद हाश्मी(२७) या तरुणाने आत्महत्या केल्याची घटना शनिवारी घडली आहे.

शमिनी जमशेद हाश्मी यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, रिजवान याला नशा करण्याचे व्यसन होते. नशेमध्ये तो कुठेही पडायचा. शनिवारी त्याला नशा करण्यासाठी जाऊ न दिल्याने रागाच्या भरात त्याने घराच्या पोटमाळ्यावर जाऊन दरवाजा आतून बंद केला. त्याने छताच्या लोखंडी पाईपला ओढणी बांधून त्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस हवालदार रणजित भोसले हे तपास करत आहेत.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. ३



मीरा रोड येथील व्यावसायिक मार्गदर्शन मेळाव्यास माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे उपस्थित होत्या.

# महिला बचतगट मेळाव्यात रश्मी ठाकरे उपस्थित

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या महिला आघाडीने शनिवारी मीरारोडच्या एस के स्टोनजवळ आयोजित केलेल्या महिला बचतगट व्यावसायिक मार्गदर्शन मेळाव्यास माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे या रात्री उपस्थित राहिल्या होत्या. मेळाव्यात महिलांना बचत गट, रोजगाराच्या संधी, विविध योजना आदींबद्दल मातोश्री प्रतिष्ठानच्या रंजना नेवाळकरसह अन्य तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी खासदार राजन विचारे व संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, शंकर वीरकर, संदीप पाटील, प्रवीण पाटील, लक्ष्मण जंगम, दिनेश नलावडे उपस्थित होते.

## महिलांनो स्वाभिमानी व स्वावलंबी बना - ठाकरे

रश्मी ठाकरे यांनी महिलांना स्वाभिमानी व स्वावलंबी बना, असे सांगत महिला आघाडीच्या मेळावा आयोजक पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. त्यांच्यासोबत शिवसेना नेत्या विशाखा राऊत, ज्योती ठाकरे, प्रवक्त्या संजना घाडी, रेखा खोपकर, रोशनी कोरे-गायकवाडसह मीरा भाईंदर महिला संघटक स्नेहल सावंत, सुप्रिया घोसाळकर, तेजस्वी पाटील, माजी नगरसेविका तारा घरत, शर्मिला बगाजी, नीलम ढवण, युवती सेनेच्या आकांक्षा वीरकर आदी उपस्थित होत्या. यावेळी खासदार राजन विचारे यांच्या कार्यकाळातील विविध विकासकांची माहिती उपस्थितांना चित्रफितीद्वारे दाखविण्यात आली.

# नाकातून रक्त येऊन १० दिवसांच्या मुलीचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** मीरारोडच्या मंगलनगर भागातील एव्हरग्रीन सिटी इमारतीत एका १० दिवसांच्या मुलीचा नाकातून रक्त येऊन झोपेत मृत्यू झाल्याची नोंद काशिगाव पोलिसांनी १५ मार्चला केली असतानाच १६ मार्च रोजी एक दिवसाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची नोंद काशिगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. विनयनगर भागात सिल्वर सरिता शिफ्टिंगमध्ये राहणाऱ्या रवींद्र पासवान यांच्या पत्नीने नवजात मुलीस जन्म दिला, परंतु एक दिवसाच्या त्या मुलीला श्वास घेण्यास त्रास होऊन ऑक्सिजन कमतरतेमुळे तिचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे, काशिगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# नायगाव उड्डाणपूल चालकांसाठी फायदेशीर, रहिवाशांसाठी डोकेदुखी

लोकमत न्यूज नेटवर्क,

**नालासोपारा :** नायगाव पूर्व-पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल रहिवाशांसाठी डोकेदुखी ठरतो आहे. या पुलावरून अनेकदा बाटल्या व इतर साहित्य, कचरा टाकला जातो. शनिवारी रात्री अज्ञातांनी या पुलावरून नारळ, हार-फुले व इतर अवजड सामानाने भरलेली गोणी अंधारात फेकून दिली. मिटना पाडा येथील रहिवासी मनोज पटेल यांच्या घरावर ही गोणी पडली. यात घरावरील पत्रे फुटले, मात्र त्यावेळी घरातील सदस्य बाहेर गेले असल्यामुळे दुखापत झाली नाही.

## उपाययोजना करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा



- दळणवळणाच्या दृष्टिकोनातून नायगाव पूर्व-पश्चिम उड्डाणपूल बांधण्यात आला आहे. हा पूल रहिवाशांना त्रासदायक ठरला आहे. पुलाच्या खालच्या बाजूस राहणाऱ्या नागरिकांच्या घराचे पत्रे फुटून नुकसान झालेले आहे. शनिवारीही अशीच घटना घडल्यावर येथील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.
- काही वाहनधारक या पुलावरून जाताना बेजबाबदारपणे वस्तू फेकत असतात. यामुळे या भागात एखादा अपघात घडून जीवितहानी झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल येथील नागरिकांनी केला आहे. एमएमआरडीएने या पुलावर आवश्यक उपाययोजना करून गैरप्रकारांना निर्बंध घालण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी रहिवाशांची मागणी आहे. तसे न झाल्यास या पुलावर बसूनच आंदोलन करण्याचा इशारा येथील समाजसेविका अभिलाषा वर्तक यांनी दिला आहे.

CamScanner

सकाळ पु. पान क्र. १





**वसई :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर कॉंक्रीटीकरणाच्या कामामुळे वाहनांच्या लांबलचक रांगा लागत आहेत. अनेक ठिकाणी खड्ड्यांसह चिखल पसरला आहे.



# वाहतूक कोंडीचा शिमगा

## कॉंक्रीटीकरणामुळे रस्त्यावर खड्डे, चिखलाचे साम्राज्य

**प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा**

वसई, ता. १७ : रस्त्यावर पाणी, खड्डे, मातीचा थर या समस्या चालकांना पावसाळ्यात भेडसावतात. मात्र, मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ऐन उन्हाळ्यात प्रवास करताना या आव्हानांना तोंड देण्याची वेळ आली आहे. महामार्गाचे कॉंक्रीटीकरण सुरू असल्याने वाहनांच्या लांबलचक रांगा लागत आहेत. या प्रकरणी उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने बैठका घेतल्या, तरीही मूळ समस्या कायम असल्याने राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करताना नागरिकांचा 'शिमगा' होत आहे.

गुजरातहून मुंबईकडे जाणारा मार्ग कोंडीच्या विळख्यात सापडला आहे. विरार-शिरसाड, भालिवली, पेल्हार, वसई, चिंचोटी, मनोर यासह अन्य ठिकाणी कोंडीने रौद्र रूप धारण केले आहे. उड्डाणपुलासह सेवा रस्त्यावरदेखील वाहतूक यंत्रणा कोलमडली असल्याचे दिसून येते. याचा सर्वाधिक फटका अत्यावश्यक सेवांना बसत आहे. महामार्गावरून प्रवास करताना रुग्ण, गर्भवती, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, वाहनचालकांसह प्रवाशांचा जीव मेटाकुटीस येत आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्ग राष्ट्रीय प्राधिकरण विभाग, पोलिस, वाहतूक विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग, लोकप्रतिनिधींनी याबाबत गांभीर्याने घेत कोंडीवर अंकुश मिळविण्याकरिता बैठक घेतली; परंतु तरीही कोंडीला वाट मिळेना, अशी परिस्थिती आहे. या बैठकीत विविध उपाययोजनांवर चर्चा झाली होती, मात्र महामार्गावर वाहनांच्या रोजच भल्यामोठ्या रांगा पाहता कृतिशील पावले उचलण्याची गरज असल्याचे दिसून येते.

**विरुद्ध दिशेने प्रवास :** कोंडीचा सामना करताना कमी वेळेत अंतर कापण्यासाठी अनेक दुचाकी, चारचाकी वाहने विरुद्ध दिशेचा वापर करू लागली आहेत; परंतु यामुळे अपघाताची शक्यता निर्माण होऊ शकते. याकडे प्रशासनाकडून लक्ष दिले जात नाही.



### वाढते प्रदूषण रोखण्याचे आव्हान

कोंडीमुळे इंधनातून येणारा धूर मोठ्या प्रमाणात हवेत मिसळतो. त्यामुळे प्रवासादरम्यान नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. वाढत्या प्रदूषणाची चिंता निर्माण होऊ लागली असून प्रदूषण रोखायचे कसे, असा प्रश्न समोर येत आहे.

गुजरातहून मुंबईकडे दिशेने जाताना पालघर परिसरात वाहनांच्या प्रचंड रांगा लागतात. त्यामुळे चालकांची गैरसोय होते. उष्णतेच्या वाढत्या झळा अधिक असून कोंडीतून वाहन बाहेर काढेपर्यंत त्रास सहन करावा लागतो.
- **सुरेश जयस्वाल**, वाहनचालक

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पावसाळ्यात अनेक अडचणी येत असतात. आता मार्चमध्येही कोंडीचे विघ्न कायम आहे. पालघरला शासकीय कामानिमित्त जाण्यासाठी मार्ग सुकर होत नाही. अधिक वेळ खर्ची जात आहे.
- **अर्जुन कुमार**, प्रवासी

महामार्गाचे कॉंक्रीटीकरणाचे करण्यात येत आहेत, ही चांगली बाब आहे, मात्र मार्गावर सातत्याने प्रचंड कोंडी असते. काही ठिकाणी खड्डे आहेत. त्यातच अवजड वाहने धावत असल्याने काळजी घ्यावी लागत आहे.
- **तुषार दास**, प्रवासी

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वाहतूक पोलिस तैनात करण्यात आले असून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जातो. कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू असल्याने अवजड वाहने सावकाश चालवण्याचे निर्देश दिले जात आहेत. चालकांनी वाहतून नियमांचे पालन करावे.
- **विठ्ठल चिंतामण**, उपनिरीक्षक, प्रभारी वाहतूक विभाग, चिंचोटी महामार्ग

### चिखलातून मार्गक्रमण

नागरिकांना चालताना वाहनांचा अडसर निर्माण होत असताना अनेक ठिकाणी चिखलयुक्त रस्ते दिसून येत आहेत. रस्त्यावर खड्डेदेखील आहेत. अशातच पायी चालणाऱ्या प्रवाशांना गैरसोय निर्माण होते, मात्र याबाबत कोणतीच दखल घेतली जात नसल्याने नागरिकांतून नाराजीचा सूर उमटत आहे.

### शनिवार-रविवारी अधिक झळ

आठवड्याच्या शनिवारी व रविवारी वाहतुकीला मोठा फटका सहन करावा लागतो. नागरिक सुट्टीनिमित्त बाहेर फिरण्याचा बेत आखतात; परंतु वाटेत वाहतुकीची समस्या त्यांच्यासमोर येऊन ठेपते आणि तासनतास कोंडीत वेळ खर्ची जातो.

### फेरीबोटीतून प्रवास

महामार्गावर कोंडी होत असताना प्रवासासाठी नागरिकांकडून फेरीबोटीला पसंती दिली जात आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईत जाण्यासाठी आमदारांनाही फेरीबाटीचा आधार घ्यावा लागला होता. फेरीबोटींतून दुचाकी, चारचाकी नेत नागरिक वसई-भाईंदर प्रवास करत आहेत; परंतु पालघरला ये-जा करण्यासाठी अन्य पर्यायी मार्ग नसल्याने द्राविडी प्राणायाम करावा लागतो.

CamScanner

म. टा. पू. पान क्र. 1

# अवैध पक्षकार्यालये लक्ष्य

## आचारसंहिता लागताच मिरा-भाईंदर महापालिकेचा बडगा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

देशभरात लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होताच, मिरा-भाईंदर महापालिका 'अॅक्शन मोड'मध्ये आली आहे. शहरात बेकायदाउभारण्यात आलेल्या राजकीय पक्षांच्या कार्यालयांवर शनिवारी पाडकाम कारवाई करण्यात आली. यात सर्वच पक्षांच्या कार्यालयांचा समावेश आहे.

मिरा-भाईंदर शहरातील विविध भागांत रस्त्यालगत असणाऱ्या मोकळ्या जागेत, फुटपाथवर व इतर ठिकाणी शिवसेना शिंदे गटाकडून काही महिन्यांपूर्वी कंटेनर शाखा उभारण्यात आल्या होत्या.या शाखा बेकायदा असल्याचे सांगत, त्याविरोधात ठाकरे गटासह काँग्रेस व मनसेने आक्रमक भूमिका घेतली होती. तसेच बेकायदा शाखांवर कारवाईच्या मागणीसाठी त्यांच्याकडून आंदोलनही करण्यात आले होते. तर शिंदे गटाने विरोधी पक्षांच्या बेकायदा कार्यालयांची यादी महापालिकेला सादर करत कारवाईची मागणी केली होती.



त्यामुळे कंटेनर शाखेवरून सुरू झालेला वाद काही दिवस चांगलाच तापला होता.त्यावर सर्वसामान्यांकडून सरसकट सर्वच बेकायदा कार्यालयांवर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका व्यक्त होत होती. तर, यावर महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यालयांवर कारवाईची भूमिका घेत त्यांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते.यात शिवसेना शिंदे गट,राष्ट्रवादी, मनसे आदी पक्षांची २० कार्यालये बेकायदा असल्याचे निष्पन्न झाले होते. म्हणून मागील आठवड्यात बेकायदा कार्यालयांना मनपाकडून नोटिसा बजावण्यात आल्या होत्या.

यात बांधकाम तत्काळ काढून घेण्याचे आदेश देण्यात आले होते. अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला होता. शनिवारी निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकांची घोषणा करत, आचारसंहिता लागू करताच महापालिकेने नोटिसा बजवलेल्या कार्यालयांवर पाडकाम कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली. रात्रीपर्यंत शिवसेना शिंदे गटाच्या गोल्डन नेस्ट, इंद्रलोक व इतर भागांतील चार कंटेनर शाखा, मनसे व राष्ट्रवादीचे प्रत्येकी एका कार्यालयावर कारवाई करण्यात आली असल्याचे महापालिकेने सांगितले.

### कारवाई अर्ध्यावर थांबवल्याचा आरोप

काशिमिरा भागात शिंदे गटाने उभारलेल्या कंटेनर शाखेवर कारवाई करण्यासाठी पालिकेचे पथक क्रेनसह शनिवारी रात्री दहा वाजताच्या सुमारास दाखल झाले होते. परंतु, काही वेळाने कारवाई न करताच हे पथक निघून गेले. राजकीय दबावाखाली कारवाई अर्ध्यावरच थांबवण्याचा आरोप मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. तर बेकायदा शाखा काढून घेण्यास राजकीय पक्ष स्वतः तयार झाल्याने त्यासाठी त्यांना वेळ देण्यात आल्याचे स्पष्टीकरण पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून देण्यात आले.

# 'नियोजन करा, अन्यथा रस्त्यांची कामे बंद पाडू'

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

- नियोजनाअभावी वाहतूककोंडीत भर
- भाजप नेत्याचा मनपाला इशारा

मिरा-भाईंदर महापालिकेने एकाच वेळी अनेक रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे हाती घेतली आहेत. परिणामी, हवेतील धुळीचे प्रमाण वाढले असून वाहतूककोंडीतही भर पडली आहे. याचा सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास होत असल्याने महापालिका प्रशासनाने तात्काळ उपायोजना कराव्यात, अन्यथा रस्त्याचे काम बंद पाडू, असा इशारा भाजपचे नेते रवी व्यास यांनी दिला आहे.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील डांबरी रस्त्यांवर दरवर्षी पावसाळ्यात खड्डे पडत असल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून खड्डे चुकवत प्रवास करावा लागतो. रस्त्यांची कामे चांगल्या दर्जाची केली जात नसल्याने ही परिस्थिती उद्भवत असली तरी शहराची भौगोलिक परिस्थिती याला जबाबदार असल्याचा दावा महापालिकेकडून करण्यात येत आहे. तसेच, त्यावर तोडगा म्हणून सर्व रस्ते काँक्रीटचे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामाने मागील दोन महिन्यांपासून



वेग पकडला आहे. मात्र त्यासाठी शहरांतर्गत असलेले अनेक रस्ते वाहतूक नियोजनाचा विचार न करताच खोदण्यात आले आहेत. परिणामी, वाहतूककोंडीत मोठी भर पडली आहे. तसेच, धुळीमुळे वायूप्रदूषणातही वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह व्यापारी मागील काही महिन्यांपासून त्रस्त झाले असून त्यांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महापालिका प्रशासनाला पत्र लिहून व्यास यांनी या समस्येकडे लक्ष वेधले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे सांगत व्यास यांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक बोलावून उपाययोजना कराव्यात, अन्यथा नाईलाजास्तव काँक्रीट रस्त्यांच्या विरोधात जनआंदोलन करून ते बंद पाडावे लागेल, असा इशारा त्यांनी पत्राद्वारे पालिका आयुक्त संजय काटकर यांना दिला आहे.

CamScanner

पुढारी पृ. पान क्र. १

# सायबर गुन्ह्यांचा लवकर तपास होण्यासाठी सर्व पोलीस ठाण्यात सायबर कर्मचारी

**मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात सायबर गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. या वाढत्या सायबर गुन्ह्यांची संख्या कमी करण्यासाठी व या गुन्ह्याचा तपास लवकर करून गुन्हेगारांवर आळा घालण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावरच दखल घेऊन त्यावर त्वरित तपास करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाणे अंतर्गत सायबर कर्मचारी नियुक्त करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी घेतला आहे. यामुळे घडलेले सायबर गुन्हे लवकर उघडकीस येऊन फसवणुक झालेल्या व्यक्तीला न्याय मिळेल.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत १७ पोलीस ठाणे आहे. गेल्या काही महिन्याचा आलेख पाहता सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. सोशल मिडियाद्वारे नागरिकांना विविध आमिषे दाखवून सायबर गुन्हेगार फसवणूक करत आहेत. नागरिक हे समाज माध्यमांचा वापर व्यवस्थित करत नाहीत त्यामुळे या सायबर जाळ्यात अडकतात. ऑनलाईन आर्थिक फसवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. सायबर गुन्ह्यांना नागरिक बळी पडू नये यासाठी पोलिसांकडून विविध प्रयत्न केले जातात. नागरिकांना जागरूक करण्यासाठी पथनाट्य, सायबर रिल्स स्पर्धा व महाविद्यालय मार्गदर्शन शिबिराचे पोलिसांकडून आयोजन केले जात आहे. शिवाय अशा गुन्हाचा तपास करण्यासाठी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे देखील तयार करण्यात आले आहे. पोलिस करत असलेल्या प्रयत्नामुळे गुन्हेगारांना आळा बसत आहे. सायबर पोलिसांनी अनेक गुन्हे उघडकीस आणून फसवणूक झालेल्या नागरिकांची रक्कम परत मिळवून दिली आहे.

त्यामुळे पोलीस आयुक्तालयात दाखल होणाऱ्या सायबर गुन्हावर लगेच तपास करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर कर्मचारी नियुक्त करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी घेतला आहे.यापूर्वी सायबर प्रकरणातील तक्रारी सायबर पोलीस ठाण्याअंतर्गत जात असल्याने त्यात बराच वेळ लागत होता. मात्र आता येणाऱ्या तक्रारींचे पोलीस ठाण्यातील सायबर कर्मचारी अवलोकन करून त्यात आवश्यक ती पावले झटपट उचलणार आहेत. या संदर्भात पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण .देण्याचे काम सुरु असल्याची माहिती पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिली आहे.

CamScanner
CamScanner